जळगाव, दि. २९ सप्टेंबर २०२६ : राज्यभर राबविण्यात येत असलेल्या 'रोजगार महाकुंभ-महाराष्ट्र' या उपक्रमांतर्गत कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव येथे मंगळवार, दि. २९ सप्टेंबर रोजी दीनदयाल उपाध्याय 'महाकुंभ रोजगार मेळावा' आयोजित करण्यात आला. विद्यापीठाच्या युनिव्हर्सिटी इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी येथे आयोजित या मेळाव्याचे उद्घाटन राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून संपन्न झाले.

यावेळी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी, गरवारे हाय टेक फिल्मचे उपमहाव्यवस्थापक अरुण महाजन, एसबीआय लाईफ इन्शुरन्सचे जितेंद्र इंगळे, युनिव्हर्सिटी इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजीचे संचालक प्रा. ए. के. गोस्वामी, डॉ. राजेश जवळेकर, औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य डॉ. नवनीत चव्हाण, अधिसभा सदस्य केदारनाथ कवडीवाले यांच्यासह विद्यापीठातील प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

गरवारे हाय टेक फिल्मचे उपमहाव्यवस्थापक अरुण महाजन यांनी उपस्थित उमेदवारांना विविध कंपन्यांना आवश्यक असलेल्या मनुष्यबळाबाबत मार्गदर्शन केले. उद्योग क्षेत्रात उमेदवारांकडून कोणत्या प्रकारची कौशल्ये अपेक्षित असतात, याबाबत त्यांनी माहिती दिली. केवळ शैक्षणिक पात्रतेसोबतच आवश्यक कौशल्ये आत्मसात करण्याचे आवाहन त्यांनी केले.

कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी यांनी मार्गदर्शन करताना, "शिक्षणाला पर्याय नाही. शिक्षणाचा एक महत्त्वाचा उद्देश म्हणजे स्वतःला रोजगारक्षम बनविणे हा आहे. पदवीसोबत आवश्यक कौशल्यविकास केला, तर रोजगाराच्या संधी निश्चितच उपलब्ध होतात," असे सांगितले. मुलाखतीला सामोरे जाताना उमेदवारांनी स्वतःवर विश्वास ठेवून आत्मविश्वासाने मुलाखत द्यावी, असे आवाहन करत आजच्या मेळाव्यात संधी न मिळालेल्या उमेदवारांनी आत्मपरीक्षण करून अधिक मेहनत करण्याचे आवाहनही त्यांनी केले.

या रोजगार मेळाव्यासाठी एकूण ४०० उमेदवारांनी प्राथमिक ऑनलाइन नोंदणी केली होती. त्यापैकी २०४ उमेदवार प्रत्यक्ष उपस्थित राहून मुलाखतीला सामोरे गेले. पहिल्या फेरीत ७० उमेदवारांची निवड करण्यात आली, तर १३ उमेदवारांना नियुक्तीपत्रे देण्यात आले.

या मेळाव्यात एकूण १४ नामांकित कंपन्या सहभागी झाल्या होत्या. यामध्ये एसबीआय लाईफ, गरवारे फिल्म, विप्रो कन्झ्युमर अँड पर्सनल केअर, जैन इरिगेशन सिस्टीम्स यांच्यासह विविध कंपन्यांचा सहभाग होता. विविध कंपन्यांच्या प्रतिनिधींनी उमेदवारांच्या मुलाखती घेतल्या तसेच रोजगाराच्या उपलब्ध संधींबाबत माहिती दिली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. राजेश जवळेकर यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन विश्वराज तायडे यांनी केले.

बातमी नं. २

जळगाव, (प्रतिनीधी) दि. २९ सप्टेंबर : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठांतर्गत असलेल्या बौध्दीक संपदा हक्क विभाग (आयपीआर सेल) व रासायनिक शास्त्र प्रशाळेच्या संयुक्त विद्यमाने दि. २९ सप्टेंबर २०२६ रोजी 'कॉपीराईट फॉर ॲकेडमिया-२०२६' याविषयावर एक दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन विद्यापीठाच्या अधिसभा सभागृहात करण्यात आले.

या कार्यशाळेच्या उद्घाटन भारत सरकारच्या स्वामित्वहक्क कार्यालयाचे निबंधक तथा विद्यापीठाचे माजी विद्यार्थी डॉ. दिनेश पाटील यांच्या हस्ते झाले. यावेळी मंचावर अध्यक्षस्थानी कुलगुरू प्रा.व्ही.एल. माहेश्वरी, के.बी.आय.पी. सर्व्हीसेस प्रा. लि., पुणे येथील डॉ. खुशबू भुरट, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, आयपीआर चेअर प्रोफेसर डॉ. डी.जी. हुंडीवाले, प्रशाळा संचालक प्रा. दीपक दलाल, समन्वयक प्रा. विकास गीते उपस्थित होते.

या चर्चासत्रात उद्घाटकीय भाषण करतांना डॉ. दिनेश पाटील यांनी सांगितले की, बौध्दीक संपदा हा निर्मात्याचा अधिकार आहे. एखाद्याने निर्माण केलेल्या साहित्याचा वापर करतांना जबाबदारीपूर्वक व जाणीवपूर्वक संबंधितास श्रेय देवून बौध्दीक संपदा अधिकार कायद्याच्या तरतूदी विचारात घेवून करण्यात यावा. कॉपीराईटचा वापर मुक्तपणे करता येणार नाही. सर्जनशीलता, नवीन कल्पना व ज्ञाननिर्मितीस प्रोत्साहन देण्याचे कार्य भारत सरकारच्या स्वामित्वहक्क कार्यालयाद्वारे करण्यात येते. अध्यक्षीय समारोप करतांना कुलगुरू प्रा.व्ही.एल. माहेश्वरी यांनी सांगितले की, जगाच्या तुलनेत पेटंट नोंदणी करण्यामध्ये भारताचे स्थान वरच्या क्रमांकावर नेण्याकरीता अधिकाधिक पेटंट नोंदणी होणे आवश्यक आहे. जगामध्ये देशाचे स्थान त्या देशाकडून किती पेटंट निर्माण झाले यावर ठरते. विद्यापीठाने स्थापन केलेल्या बौध्दीक संपदा कक्षाकडून गेल्यावर्षाभरात २२ पेटंट नोंदणी झाले आहेत. विद्यापीठ परिक्षेत्रातील विद्यार्थ्यांनी, शिक्षकांनी या कक्षाच्या सुविधांचा फायदा घ्यावा असे आवाहन केले. डॉ. दिनेश पाटील हे या विद्यापीठाचे माजी विद्यार्थी आहेत. त्यांनी योग्य मेहनत, चिकाटी व सात्यतता ठेवून उंचीच्या पदावर आजे ते विराजमान आहेत. विद्यार्थ्यांनी नेहमी परिश्रम व सात्यतता ठेवून उज्वल भविष्य घडवावे असेही सांगितले.

या चर्चासत्रात के.बी.आय.पी. सर्व्हीसेस प्रा. लि., पुणे व विद्यापीठाच्या बौध्दीक संपदा कक्ष यांच्या सामंजस्य करार करण्यात आला. या करारावर डॉ. खुशबू भुरट व विद्यापीठातर्फे कुलसचिव डॉ. विनोद पाटील यांनी स्वाक्षरी केल्या. या करारामुळे विद्यापीठातर्फे पेटंट बाबतीत नोंदणी करण्याकरीता सहकार्य केले जाणार आहेत.

कार्यक्रमाच्या उद्घाटन सत्रानंतर मुख्य व्याख्यानात भारत सरकारच्या स्वामित्वहक्क कार्यालयाचे निबंधक डॉ. दिनेश पाटील यांनी बौद्धिक संपदा हक्कांचे महत्त्व आणि त्यासंदर्भातील विविध बाबींवर मार्गदर्शन केले.

डॉ. खुशबू भुराट यांनी 'कॉपीराइटची मूलभूत माहिती व बौद्धिक संपदा हक्क' या विषयावर मार्गदर्शन करताना कॉपीराइटची संकल्पना, त्याचे महत्त्व आणि बौद्धिक संपदा हक्कांमधील त्याचे स्थान स्पष्ट केले.

राष्ट्रीय बौद्धिक संपदा व्यवस्थापन संस्थेचे, नागपूर येथील सहाय्यक नियंत्रक कुमार राजू यांनी 'कॉपीराइट अर्ज दाखल करण्याचे प्रात्यक्षिक' या विषयातून कॉपीराइट नोंदणी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया प्रात्यक्षिकासह समजावून सांगितली.

यानंतर अनोव्हआयपी प्रा. लि., नवी दिल्लीच्या रती रस्तोगी यांनी 'कृत्रिम बुद्धिमत्ता आणि कॉपीराइट : डिजिटल युगातील आव्हाने व भविष्य' या विषयावर मार्गदर्शन केले. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वाढत्या वापरामुळे कॉपीराइट क्षेत्रासमोर निर्माण होणारी आव्हाने तसेच डिजिटल युगातील भविष्यातील बदलांवर त्यांनी प्रकाश टाकला. ॲड. विकास आवळे यांनी 'कॉपीराइटची अंमलबजावणी व उल्लंघनासंदर्भातील प्रकरणांचा अभ्यास' या विषयावर मार्गदर्शन करताना कॉपीराइट उल्लंघन आणि त्याची कायदेशीर अंमलबजावणी यासंदर्भातील विविध प्रकरणांचा आढावा घेतला.

॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon
'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

जनसंपर्क विभाग

तसेच साजिद अख्तर यांनी 'कॉपीराइट क्षेत्रातील करिअरच्या संधी' या विषयावर मार्गदर्शन करताना या क्षेत्रातील विविध रोजगार व व्यवसायाच्या संधींची माहिती दिली. या चर्चासत्रात एकूण २२५ प्राध्यापक व विद्यार्थी सहभागी झाले. यावेळी रसायनशास्त्र प्रशाळेतील शिक्षक, चर्चासत्राचे सचिव डॉ. सारंग बारी, मयुर पाटील व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बातमी नं. ३

जळगाव, दि. २९ सप्टेंबर २०२६ : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या भाषा अभ्यास प्रशाळा व संशोधन केंद्रातर्फे हिंदी पंधरवड्या निमित्त भितीपत्रिकेचे विमोचन करण्यात आले. यावेळी मंचावर आकाशवाणी केंद्र जळगाव येथील डॉ. उषा शर्मा, भाषा प्रशाळेचे संचालक प्रा. म.सू. पगारे उपस्थित होते.

मनोगत व्यक्त करताना उषा शर्मा म्हणाल्या की, प्रत्येक भाषेमध्ये यश हे मिळत असते. यासाठी आपण आपले संपूर्ण वेळ दिला गेले पाहिजे. तसेच भाषेविषयी प्रेरणा त्यांना आपल्या वडिलांकडून मिळाली. प्रत्येक विषयाचा अभ्यास हा सखोल केला गेला पाहिजे, भाषा ही सुंदर असते प्रत्येक भाषेचे ज्ञान असलेच पाहिजे असे देखील त्या म्हणाल्या.

विद्यार्थ्यांमध्ये हिंदी भाषेविषयी जागृती आणि कौशल्य विकसित व्हावे यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. कार्यक्रमात भाषा अभ्यास प्रशाळेतील हिंदी विभाग प्रमुख प्रा. सुनील कुलकर्णी, डॉ. दीपक खरात, प्रा. प्रतिभा गलवाडे, शिक्षक निखिल तायडे, महेश सूर्यवंशी संशोधक विद्यार्थी खेमराज पाटील, सुकन्या जाधव यांच्यासह शिक्षकेतर कर्मचारी व प्रशाळेतील विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. प्रीती सोनी केले.

.......................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२६ दिनांक: २९ सप्टेंबर, २०२६

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

जनसंपर्क अधिकारी करीता